15 MAY 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समुदाय विकासात रेडिओचे भरीव योगदान : डॉ. पाटील



**बैठकीत बोलताना डॉ. सचिनकुमार पाटील. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. युवराज जाधव, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, अभिषेक पाटील आदी.**

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतीय समाजात रेडिओला विशेष महत्त्व आहे. अनेक स्थित्यंतरे आली तरी रेडिओची गरज कमी झाली नाही. उलट समुदायाच्या विकासात रेडिओ उत्तरोत्तर भरीव योगदान देत आहे, असे मत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात मीडिया आणि कम्युनिकेशन क्लब अंतर्गत 'कम्युनिटी रेडिओ समजून घेताना' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते.

यावेळी जयप्रकाश पाटील यांनी कम्युनिटी रेडिओचा इतिहास विशद केला. अभिषेक पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या शिववाणी कम्युनिटी रेडिओबद्दल माहिती दिली. यावेळी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील डॉ. युवराज जाधव, अनुप जत्राटकर यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. आभार डॉ. सुमेधा साळुंखे यांनी मानले.


डॉ. पाटील म्हणाले, माहितीचा प्रसार करण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते. रेडिओसारख्या माध्यमाने विश्वासार्हतेच्या जोरावर समाजमनावर अधिराज्य गाजवले आहे. सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे माध्यम म्हणून रेडिओ केंद्रस्थानी राहिला आहे. कम्युनिटी रेडिओच्या रुपात त्याने समुदायाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

1 5 MAY 2026

दै. रणझुंझार (बेळगाव)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचा हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

1 5 MAY 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचा हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नालॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, डॉ. उमाकांत हत्तीकट, उपकुलसचिव गजानन पळसे, सुरेश बंडगर, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.

1 5 MAY 2026

तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रमिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. अजित कोळेकर, डॉ. सावलीराम घाणे आदी.

# छत्रपती संभाजी महाराजांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये गुरूवारी सकाळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. अजित कोळेकर, डॉ. सावलीराम घाणे, डॉ. उमाकांत हत्तीकट, गजानन पळसे, सुरेश बंडगर, डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.

15 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरुपदासाठी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण

## मुंबईत कुलपतींच्या उपस्थितीत प्रक्रिया

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती आज राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी मुंबईतील लोकभवनात घेतल्या. या उमेदवारांमध्ये डॉ. आर. के. कामत, ज्योती जाधव, पी. एस. पाटील, स्वाती देशमुख, संजय ढोले यांचा समावेश होता.

कुलगुरू पदासाठी इच्छुक असलेल्या सुमारे ११५ उमेदवारांनी शोध समितीकडे अर्ज दाखल केले होते. या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया पूर्ण करून समितीने २८ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी शॉर्टलिस्ट केली. त्यातून अंतिम मुलाखतीसाठी निवडण्यात आलेल्या पाच उमेदवारांना सोमवारी दुपारी चारच्या सुमारास कुलपती कार्यालयाकडून ई-मेल पाठविण्यात आले. त्यानुसार आज सकाळी अकराच्या सुमारास कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी पाच उमेदवारांच्या अंतिम मुलाखती घेतल्या. मुलाखतीसाठी उमेदवारांच्या आडनावांमधील आद्याक्षरांनुसार क्रम ठरविण्यात आला होता. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. एस. पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. संजय ढोले, अमरावतीमधील मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांच्या मुलाखती झाल्या. त्यामुळे आता या पदावर कोणाची निवड होणार याची उत्सुकता विद्यापीठ क्षेत्राला लागली आहे.

### मानांकन कसे वाढविणार...

■ या प्रत्येक उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया २० ते २५ मिनिटे चालली. त्यात काही उमेदवारांनी विद्यापीठ विकासाचा आराखडा सादर केला. कुलपतींनी त्यावर काही प्रश्न विचारले. त्याबरोबरच विद्यापीठाचे मानांकन कसे वाढविणार, ब्रँडिंग कसे करणार आदींबाबतचीही उमेदवारांची मते त्यांनी जाणून घेतली. त्यांच्यातून एका उमेदवाराची पाच वर्षांसाठी कुलगुरुपदी निवड होणार आहे.



जनसंपर्क कक्ष

1 5 MAY 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'हिंदुस्थान केमिकल्स'मध्ये 'एजीपीएम'च्या तीन विद्यार्थ्यांची निवड



वृषभ मोरे आकाश पाटील सौरभ म्हैसकर

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा कृषी रसायने व कीड व्यवस्थापन अधिविभाग आणि केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतींमधून विभागाच्या तीन विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

हिंदुस्थान गम अँड केमिकल्स लि. या बिर्ला कॉर्पोरेशन व सेंन्स्को, युरोप यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या कंपनीने गेल्या ३० एप्रिल रोजी अधिविभागात कॅम्पस मुलाखती घेतल्या. यामध्ये एमएस्सीच्या अंतिम वर्षातील अनेक विद्यार्थी सहभागी झाले. त्यामधून वृषभ मोरे, आकाश पाटील आणि सौरभ म्हैसकर या तीन विद्यार्थ्यांची कंपनीने निवड केली असून त्यांना सुरुवातीला ३ लाख प्रतिवर्ष इतके पॅकेज मिळाले आहे.

15 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्सच्या १६० हून अधिकांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांत प्लेसमेंट

- डॉ. किरणकुमार शर्मा यांची माहिती
- दहाव्या बॅचचा निरोप समारंभ



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या गेल्या दहा बॅचमधील १६० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या, विद्यापीठांमध्ये प्लेसमेंट्स झालेली आहेत, अशी माहिती संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली. विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या दहाव्या बॅचचा निरोप समारंभ नुकताच झाला. त्यावेळी ते बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्लेसमेंट यशामुळे अधिविभागाने सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली असल्याचे सांगून डॉ. शर्मा म्हणाले, अधिविभागातील विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठांसह नामांकित उद्योगसंस्थांमध्ये ६५ लाखांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळविण्यापर्यंत मजल मारली आहे. 'बीएस्सी-एमएस्सी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी'या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आजपर्यंत सर्वाधिक आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्स झालेल्या आहेत. विविध प्रकारच्या नॅनोफॉर्म्युलेशन्स,कोटिंग्ज, फॅब्रिक्स, पेंटिंग, फार्मास्युटीकल्स्, नॅनोमटेरियल्स निर्मिती, पुरवठा तसेच सर्विसेस इत्यादीसाठीच्या विविध राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये तसेच विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संकुलात करिअर प्रोग्रेशनसाठी येथील शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी नियुक्त झाले आहेत.

### केंद्र सरकारमध्ये सहा तर आठ विद्यार्थी राज्य शासनात विविध पदांवर

१६० पेक्षा अधिक विद्यार्थी अमेरिका,कॅन, युके, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इटली, इस्राइल, फिनलँड, फ्रान्स, झेक रिपब्लिक, पोलंड, स्वीत्झर्लंड, दक्षिण कोरिया, जपान, चीन, सौदी अरेबिया, तैवान तसेच स्वीडन इत्यादी देशांमध्ये कार्यरत आहेत. सहा विद्यार्थी केंद्र सरकारमध्ये तर आठ विद्यार्थी राज्य शासनात विविध पदांवर नियुक्त झाले आहेत, अशी माहिती देण्यात आली.

प्रतिवर्षी ६५ लाख रुपये पॅकेज मिळविणाऱ्यांमध्ये डॉ. रोहन पाष्टे (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, तैवान), डॉ. हर्षदा पाटील (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, सिंगापूर), डॉ. अतुल खोत (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. किरण निर्मल (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. शुभम पाटील (नेक्स्टईन सेमीकंडक्टर, दक्षिण कोरिया) यांचा समावेश आहे. विभागातील आठ विद्यार्थ्यांनी भारतात स्वतःच्या स्टार्टअप कंपन्या स्थापित केल्या असून त्या उत्तमरित्या कार्यरत आहेत. या यशस्वी प्लेसमेंटमुळे अधिविभागाची शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधनक्षमता अधोरेखित झाली असून,विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवरील संधींचे दरवाजे खुले झाले आहेत. या प्लेसमेंट्समध्ये वर्षागणिक वाढ होत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

दरम्यान, सन २०२१-२२ मध्ये बीएस्सी, एमएस्सी. (नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी) या पाच वर्षांच्या एकत्रित अभ्यासक्रमाच्या तसेच सन २०२४-२५ मध्ये एमएस्सी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. निरोप समारंभात शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. खोत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. के. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. प्रमोद कसबे, डॉ. एस. एस. निर्मळे, डॉ..एस. ए. सावंत, डॉ. वाय. वाय. पाटील यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### उज्ज्वल भवितव्य घडविण्याची संधी

बारावी सायन्सनंतर बीएस्सी-एमएस्सी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या पाच वर्षांच्या एकत्रित अभ्यासक्रमासाठी तसेच बीएस्सी सायन्सनंतर एमएस्सी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरु झालेला आहे. याच अभ्यासक्रमांच्या माध्यमातून कोल्हापुरासह महाराष्ट्रातल्या तसेच इतर राज्यातल्याही खेडोपाड्यांतील मुलांना आपले उज्ज्वल भवितव्य घडविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शर्मा यांनी केले.

15 MAY 2026

तरुण भारत




# नॅनो सायन्सच्या १६० विद्यार्थ्यांना आतंरराष्ट्रीय कंपनीत प्लेसमेंट

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या गेल्या दहा बॅचमधील १६० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या, विद्यापीठांमध्ये प्लेसमेंट्स झालेली आहेत, अशी माहिती संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या दहाव्या बॅचच्या निरोप समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले, अधिविभागातील विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठांसह नामांकित उद्योग संस्थांमध्ये ६५ लाखांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळविण्यापर्यंत मजल मारली आहे. 'बीएससी-एमएससी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी' या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आजपर्यंत सर्वाधिक आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्स झालेल्या आहेत. १६० पेक्षा अधिक विद्यार्थी अमेरिका, कॅनडा, युके, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इटली, इस्राइल, फिनलँड, फ्रान्स, झेक रिपब्लिक, पोलंड, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया, जपान, चीन, सौदी अरेबिया, तैवान तसेच स्वीडन इत्यादी देशांमध्ये कार्यरत आहेत. विविध राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय कंपन्या व शैक्षणिक संकुलात करिअर प्रोग्रेशनसाठी येथील शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी नियुक्त झाले आहेत. यामध्ये डॉ. रोहन पाष्टे (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, तैवान), डॉ. हर्षदा पाटील (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, सिंगापूर), डॉ. अतुल खोत (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. किरण निर्मल (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. शुभम पाटील (नेक्स्टईन सेमीकंडक्टर, दक्षिण कोरिया) यांचा समावेश आहे. या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शर्मा यांनी केले. डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. खोत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. के. पवार यांनी आभार मानले.

■ डॉ. किरणकुमार शर्मा

1 5 MAY 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

**प्रतिनिधी**, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा कृषी रसायने व किड व्यवस्थापन अधिविभाग (ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट) आणि केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या कॅम्पस मुलाखतींमधून या विभागातील वृषभ मोरे, आकाश पाटील व सौरभ म्हैसकर या तीन विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे. हिंदुस्थान गम अँड केमिकल्स लिमिटेड या बिर्ला कॉर्पोरेशन व सेंन्स्को, युरोप या कंपनीने अधिविभागात कॅम्पस मुलाखती घेतल्या होत्या. यामध्ये एम.एस्सी. च्या अंतिम वर्षातील अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. यातून वृषभ मोरे, आकाश पाटील व सौरभ म्हैसकर या तीन विदयार्थ्यांची कंपनीने निवड केली असून त्यांना सुरवातीला रुपये ३ लाख रूपये प्रतिवर्षाचे पॅकेज मिळाले आहे. कंपनीचे स्टेट



वृषभ मोरे



आकाश पाटील



सौरभ म्हैसकर

हेड सचिन सैदाने आणि सरव्यवस्थापक (विक्री) ए. एच. मुलाणी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अधिविभागाचे प्रमुख डॉ. सुनील गायकवाड म्हणाले, कृषि रसायने व किड व्यवस्थापन अधिविभागामध्ये अनेक नामवंत कंपन्या नियमितपणे कॅम्पस मुलाखती घेत असतात. त्यामुळे आज अधिविभागातील विद्यार्थी अनेक नामवंत कंपन्यांमध्ये जागतिक स्तरावर काम करत आहेत.